**Max Marks: 80** **Date: 00. 00. 2022**
**Time: 3 HRS** **Seat No. ________**

## S.S.C MARATHI: SAMPLE PAPER -1 ANSWER

**सूचना : (1)** सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

**(2)** आकृत्या पेननेच काढाव्यात.

**(3)** उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

**(4)** स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

**(5)** विभाग 5- उपयोजित लेखन प्र. 5 ( अ ) 2 सारांशलेखन या घटकासाठी गदय विभागातील प्र. 1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावा.

## विभाग 1 ः गद्य ः 20 अंक

**प्र . 1 अ. पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा ः**

**कृती 1. आकलन**

**का ते लिहा :** **2**

(i) डॉ. माशेलकर यांना लहानपणीच 'माशेल' सोडावे लागले.

उ . डॉ. माशेलकर यांना लहानपणीच 'माशेल' सोडावे लागले; कारण त्यांच्या वयाच्या सहाव्या वर्षी माशेलकर यांचे वडील वारले आणि उदरनिर्वाहासाठी त्यांना माशेल सोडावे लागले.

(ii) शाळेत कसा जाऊ? असा प्रश्न माशेलकर यांना पडला.

उ . 'शाळेत कसा जाऊ?' असा प्रश्न माशेलकरांना पडला; कारण त्यांना शाळेची कोणतीच फी भरणे शक्य नव्हते.

**कृती 2. (आकलन)** **2**

**(i).** डॉ. माशेलकर यांचे सर्वस्व-

**(ii)** शिक्षणासाठी आसुसलेला-

उ . (i) त्यांची आई

(ii) डॉ. माशेलकर

शाळा आणि शिक्षक असा विषय निघाला, की मला माझी मुंबईतील शाळा आणि शालेय जीवनातील शिक्षकांची आठवण येते.गिरगावातील युनियन हायस्कूल आणि माझ्या शाळकरी वयात आपुलकीनं संस्कार करणारे भावे सर, जोशी सर, शिर्के सर या साऱ्यांचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे; पण त्याच वेळी हेही सांगितले पाहिजे, की या शाळेशी आणि या संस्कार देणाऱ्या शिक्षकांशी माझा जो संपर्क आला, तो जिच्यामुळे आला ती माझी परमप्रिय आई आणि माझे मामा यांचे ऋण मी कसे व्यक्त करणार? आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते. माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती, तर माझे सर्वस्व होती.

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल

हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये मालती निवासातील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहत होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दरिद्र्याशी संघर्ष करणारी

माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्या वेळचं वातावरण हे असं होतं !

**कृती 3 : स्वमत**

**डॉ. माशेलकर यांचे जाणवलेले गुणविशेष सोदाहरण स्पष्ट करा.** 3

उ. डॉ. माशेलकर यांनी शालेय शिक्षण फार हलाखीत पूर्ण केले. पायात चप्पलही घालायला नव्हती. वयाच्या बाराव्या वर्षांपर्यंत त्यांना अनवाणी राहावे लागले. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांचे वडील वारले. त्यामुळे गाव सोडून ते व त्यांची आई खेतवाडीमध्ये लहानशा खोलीत राहिले. आर्थिक परिस्थिती खालावलेली व दारिद्र्याशी संघर्ष करणारी अल्पशिक्षित आई अशा परिस्थितीत डॉ. माशेलकर शिक्षणासाठी आसुसलेले होते. आईची जिद्द व शिक्षकांचे मार्गदर्शन या बळावर माशेलकरांनी प्रगती केली. भिंगाच्या साहाय्याने सूर्यकिरणाची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो. या प्रयोगातून माशेलकरांना एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि विज्ञान समजू लागले. संघर्षासाठी आत्मविश्वास बळावला. माशेलकरांना जगण्याचे भान आले. शाळा, शिक्षक व परमप्रिय आई हे त्यांचे 'संस्कार केंद्र' होते.

**प्र. 1. (आ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**
टीप: स्पष्टीकरणासाठी प्रश्न 1 (अ), कृती 1 व 2 साठी दिलेले मार्गदर्शन पाहा.

**कृती 1: (आकलन)** 2

**• एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(i) बालपणी लेखकाचा असलेला दिवसभराचा कार्यक्रम लिहा.

उ. भर उन्हात विटीदांडू खेळणे, पतंग उडवणे, चोरून पोहणे, कैऱ्या-पेरू पाडून ते खाणे आणि बॅट व स्टंप स्वतः तयार करून खेळणे असा बालपणी लेखकाचा दिवसभर कार्यक्रम असायचा.

(i) लेखकाच्या वडिलांना मुलांसाठी खेळणी घेणे का परवडत नसे ?

उ. लेखकाचे वडील तेव्हा पोलिसखात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करीत होते; म्हणून त्यांना मुलांसाठी खेळणी घेणे परवडत नसे.

**कृती 2: (आकलन )** 2

**योग्य जोड्या लावा**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) गरीब | (अ) कॅनॉल |
| (ii) तुटपुंजा | (ब) बॉल |
| (iii) कॅम्पमधील | (क) कुटुंब |
| (iv) जुनापुराणा | (ड) पगार |

उ. (i) गरीब - कुटुंब; (iii) कॅम्पमधील - कॅनॉल
(ii) तुटपुंजा - पगार; (iv) जुनापुराणा - बॉल

माझ्या बालमित्रांनो, मी तुमच्याएवढा होतो तेव्हा अगदी तुमच्यासारखाच खेळकर, खोडकर व उपद्व्यापी होतो! माझा जन्म पुण्यातच एका गरीब कुटुंबात झाला. माझे वडील त्या वेळेस पोलीसखात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करीत होते. तेव्हा साहजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दुःखे आम्ही भोगत होतो. अशा परिस्थितीत वडिलांना आम्हां मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्यच नव्हते. दुसऱ्या मुलांच्या हातात खेळणी पाहून आम्हांला त्यांचा

हेवा वाटत असे. तरी पण गल्लीतील मुलांना जमा करून उन्हातान्हात विटीदांडू खेळणे, पतंग उडवणे, कधीमधी कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे; कैऱ्या, पेरू पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे, घरात जळणासाठी आणलेल्या लाकडांतूनच बॅट व स्टंप तयार करणे व कुठून तरी जुनापुराणा बॉल पैदा करून क्रिकेट खेळणे असा माझा दिवसभराचा कार्यक्रम असायचा.

दिवसभराच्या खेळाने भूक तर खूपच लागलेली असायची. घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा. मग मी घरात एका कोपऱ्यात जाऊन रडत बसायचा! तिथेच झोप लागायची आणि जाग यायची ती आईच्या प्रेमळ कुशीत.

**कृती 3 : (स्वमत)**

**'लेखक - चंद्रू बोर्डे यांना लहानपणापासून खेळांची आवड होती. ' हे विधान पाठाच्या आधारे स्पष्ट करा.** 3

उ. लहानपणी लेखक- चंदू बोर्डे भर उन्हात विटीदांडू खेळायचे, पतंग उडवायचे, चोरून पोहायचे, कैऱ्या पेरू खाऊन मजा करायचे. त्याचबरोबर घरात जळणासाठी आणलेल्या लाकडातून बॅट व स्टंप तयार करायचे आणि क्रिकेट खेळायचे. पुढे ते चुलत्याकडे वाय.एम.सी.ए.च्या कंपाऊंडमध्ये राहायला आले, तेव्हा ते शाळा सुटल्यावर धावत ग्राऊंडवर जात. तेथे ते बॉल टाकत, ग्राऊंडमनलाही मदत करीत. वडील पुण्यात आल्यावर वडिलांनी लेखकांना जुनी बॅट आणून दिली, तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. पुढे पुना क्लबच्या ग्राऊंडवर झालेला ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेस विरुद्ध वाय. एम.सी.ए. चा क्रिकेट सामना लेखकांनी झाडावर चढून पाहिला होता. या सर्वांवरून लेखक- चंदू बोर्डे यांना लहानपणापासूनच खेळांची विशेषतः क्रिकेटची आवड होती, हे स्पष्ट होते

## अपठित गदय

**प्र. 1. (इ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**कृती 1: (आकलन)** 2

**व्याख्या लिहा :**


आपत्ती - आपत्ती : आपत्ती म्हणजे अचानक आलेले मोठे दुर्दैवी संकट होय.

**कृती 2 : (आकलन)** 2

आकृती पूर्ण करा :

आपत्तीचे उताऱ्यात उल्लेखिलेले प्रकार → [ ] → [ ]

उ.




"आपत्ती" ही नवी संकल्पना नाही. मानवी समाजाच्या इतिहास काळापासून ती ज्ञात आहे. मानवाला अनेक प्रकारच्या आपत्तींना सामोरे जावे लागले.

अलीकडील काळातील वाढते दहशतवादी हल्ले, सामाजिक हिंसा, नागरी अशांतता, भोपाळसारखी वायुगळती, समुद्रातील लाटा यांसारख्या भयानक आपत्तींची उदाहरणे माणसांच्या समोर आहेत.

जगातील विकसित आणि विकसनशील राष्ट्रांना त्यांच्या अर्थव्यवस्थांशी सुसंगत असे व्यापक आपत्ती व्यवस्थापन धोरण राबवण्याची गरज आहे. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीपासून जनतेचे, देशाचे, समाजाचे,जीवनाचे व आर्थिक, भौतिक संपत्तीचे संरक्षण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपत्ती म्हणजे अचानक आलेले मोठे दुर्दैवी संकट होय. आपत्ती काळात आपण एक-दुसऱ्यांना मदत केली पाहिजे.

## विभाग 2 : पदय

**प्र. 2. पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**कृती 1 : (आकलन)** 2

**• उदाहरणे लिहा :**

'योगी सर्वकाळ सुखदाता' ही काव्यपंक्ती स्पष्ट करणारी दोन उदाहरणे प्रस्तुत अभंगाच्या आधारे लिहा.

उ. (i) योगी पुरुषाचा गोडवा हा सर्व इंद्रियांना शांत करतो.

(ii) योगी पुरुष आपल्या संकीर्तनाने, आत्मज्ञानाने समस्त समाजाचा उद्धार करतो.

**कृती 2 : (आकलन)**

**• तुलना करा :**

उ.

| योगी पुरुष | पाणी |
|---|---|
| (i) योगी पुरुष सबाह्य निर्मळ करतो. | पाणी वरवरचा मळ धुते. |
| (ii) योगी पुरुष सर्वकाळ स्वानंदतृप्ती देतो. | पाणी क्षणभर तहान भागवते. |

जेवीं चंद्रकिरणे चकोरांसी। पांखोवा जेवीं पिलियांसी ।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।
उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां होय निवविता सर्वेंद्रियां ।।
मेघमुखें अध: पतन । उदकाचें देखोनि जाण ।
अधःपातें निवती जन अन्नदान सकळांसी ॥
तैसे योगियासी खालुतें येणें जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।

**कृती 3 : (शब्दांचे अर्थ )** 2

**• प्रस्तुत कवितेतील पुढील शब्दांचे अर्थ लिहा :**

उ. (i) उदक - पाणी (ii) पांखोवा - पक्षिणीचे पंख

(iii) निर्मल - स्वच्छ (iv) मधुरता. - गोडवा

**कृती 4 : (काव्यसौंदर्य)**

· **'योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे, ' हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.** 2

उ. संत एकनाथ महाराजांनी योगी पुरुष व पाणी यांची प्रस्तुत अभंगात सार्थ तुलना केली आहे व योगी पुरुषाचे श्रेष्ठत्व ठसवले आहे.

योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे, हे सांगताना ते म्हणतात – पाणी हे वरवरचा मळ धुवून टाकते परंतु योगी सर्व जनांचे मन अंतर्बाहय निर्मळ करून सोडतो. पाण्याने एकावेळची तहान भागवते परंतु योगी पुरुष हा सर्वांसाठी सर्वकालीन सुख देणारा सज्जन आहे. पाण्याचे सुख क्षणिक आहे. तात्पुरते आहे. पण योग्याने दिलेल्या सुखात विकृती नाही. योगी पुरुष सर्वांना स्वानंदतृप्ती म्हणजे अक्षय परमानंद देतो. पाण्याची गोडी फक्त जिभेपुरती मर्यादित असते. परंतु योग्याच्या आत्मज्ञानाची गोडी सर्वजनांच्या सर्व इंद्रियांना शांत करते. पाण्याने माणसाची पोटाची भूक भागते परंतु योगी पुरुष श्रवणकीर्तनाने माणसांच्या मनाचे पोषण करतो.

अशा प्रकारे 'योगी पुरुष हा पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे' हे संत एकनाथांनी सोदाहरण पटवून दिले आहे.

**प्र. 2 आ पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेवर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा**

**(1)** **'दोन दिवस' किंवा (2) 'रंग मजेचे रंग उदयाचे'**

(i) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री यांचे नाव **1**

उ. (i) प्रस्तुत कवितेचे कवी - नारायण सुर्वे

(ii) प्रस्तुत कवितेचा विषय - **1**

उ. कामगाराच्या आयुष्यातील वास्तव परिस्थितीचे चित्रण

(iii) 'झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले. दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.' या ओळींचा सरळ अर्थ लिहा. **2**

उ. ओळींचा सरळ अर्थ - कारखान्याच्या झोतभट्टीत जसे पोलाद शेकते, तसे मी माझे आयुष्य शेकवून घेतले. बऱ्यावाईट प्रसंगाच्या आगीतून मी तावूनसुलाखून निघालो. चार दिवसांचे अल्पसे आयुष्य जगताना दोन दिवस सुखाच्या प्रतिक्षेत, वाट पाहण्यात खर्ची घातले नि उरलेले दोन दिवस दुःखात काढले.

**किंवा**

"उधळू फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे

गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी.........

(iv) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश - **2**

उ. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश → जीवन कितीही प्रतिकूल व खडतर असले तरी स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवावा. प्रयत्नाने जीवनातील दाहकतेवर मात करता येते. जीवन सकारात्मक जगण्याची ऊर्जा ही कविता देते, तसेच मानवी निर्धार व आशावाद हे तत्त्व मनावर बिंबवले जाते.

(v) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण **2**

उ. प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे - थेट शब्दकळेतून कामगारविश्वाचे दाहक चित्रण केल्यामुळे कविता मनाला भिडते. कामगार जीवनाच्या खडतरपणाचा प्रत्यय अनुभवता येतो. कामगार जीवनाविषयी सहृदयता जागृत होते. जीवन समजून घेण्याची ओढ निर्माण होते. अशी प्रगल्भ जाणीव मनात निर्माण करणारी ही कविता आवडली.

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती लिहा** **6**

**कृती 1 व 2 : (स्वमत / अभिव्यक्ती)**

(1) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते, ते 'मोठे होत असलेल्या मुलांनो...' या पाठाच्या आधारे लिहा.

उ डॉ. होमी भाभा यांच्या मते, स्वतःच काम निर्माण करणे व काय काम करावे, हे स्वतःच ठरवणे हा सकारात्मक विचार प्रत्येकाने करायला हवा. बॉसने सांगितले तेवढेच काम करणे, ही कोती प्रवृत्ती आहे. चिंता करीत न बसता, कार्यरत व कार्यमग्न झाले की स्काय इज द लिमिट ही परिस्थिती निर्माण होते. कोणीतरी बोट धरून चालवेल, मार्ग दाखवेल ही स्थिती आरंभी ठीक आहे. परंतु शेवटी स्वतःचे मार्ग स्वतः शोधणे, ऊर्जा मिळवणे व कार्यात सक्षम होणे हे ध्येय असावे. यालाच 'स्काय इज द लिमिट' असे म्हटले आहे.

**(2) टीप लिहा : 'सग्वारो कॅक्टस'.**

उ **सग्वारो कॅक्टस**

कॅक्टसच्या अनेक जाती आहेत. परंतु सग्वारो कॅक्टस हा कॅक्टसचा राजा शोभतो.

<u>सग्वारो कॅक्टसचे दिसणे</u>

सग्वारो कॅक्टस राक्षसासारखा सुमारे ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. पन्नास वर्षात तो फक्त ३ फूट वाढतो एवढी त्याची वाढ मंद आहे. तो सुमारे २०० वर्षे जगतो. त्याची अंगरचना पाणी साठवण्यासाठी निसर्गतः केलेली असते. त्याच्या अंगावर पन्हाळीसारख्या घड्या असतात.

<u>**सग्वारो कॅक्टसचे उपयोग**</u>

तहान शमवण्यासाठी अवर्षणाच्या काळात कॅक्टस ठेचून त्याचे पाणी काढता येते. सग्वारो कॅक्टसला फळे येतात. त्यामधला गर कलिंगडाच्या गरासारखा असतो. रेड इन्डियन्स ही फळे खातात. फळाच्या गरात साखर घालून गोरखव्यासारखा टिकवता येतो. हेही रेड इंडियन्सचे खादय आहे.

(3) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वत: च्या कल्पनेने लिहा.

उ (संध्याकाळची वेळ. सूर्य क्षितिजावर अगदी अलगद विसावला आहे.)

<u>सूर्य:</u> (काहीशा तोऱ्यात) आता मी निघालो आहे येथून. हे मानवा, आता तू अंधारात डुबून जाणार.

(एक गरीब माणूस जो नुकताच दिवसभर कष्ट करून घरात आला आहे. तो कोपऱ्यात ठेवलेल्या पणतीजवळ जातो. पणतीतील वात सारखी करून पणतीत तेल घालतो आणि वात पेटवतो.)

<u>पणती</u> : हे भास्करा, तू नको चिंता करू. मी आहे ना!

सूर्य: काय ग! माझ्याशी तुलना करतेस. आता वारा येईल आणि.....

पणती: (शांतपणे) अरे हो! तू निसर्गाचा शिल्पकार, तर मी मानवाची कला. माहीत हे मला. मला जेवढे जमेल तेवढे...

सूर्य: (अत्यंत फुशारकीने वाक्य मध्येच तोडून मोठ्याने)

ही पृथ्वी आणि पृथ्वीवरील चरा - चर यांना मीच जिवंत ठेवले आहे. तुला काय जमणार ग!

पणती : हे दिवाकरा! माझा उजेड इवलासा, छोटासा आहे पण माझी इच्छा आहे की ही धरती भी उजळून टाकीन.

सूर्य: तू एकटी हे सर्व करू शकशील?

पणती : अरे भाऊ! माझ्यासोबत माझ्यासारख्या अनेक बहिणी-मैत्रिणी आहेत.

सूर्य:  (अहंकाराने) अगं चिमुरडे, तुझ्यासारख्या करोडो पणत्याही माझ्या प्रकाशाची बरोबरी करू शकणार नाहीत.

पणती : हे सूर्या, तेजोमय मित्रा, माझी इच्छा आहे की या धरतीला प्रकाशाने न्हाऊन टाकावे आणि 'इच्छा तिथे मार्ग असतोच' हे मला माझ्या उदाहरणातून सर्वांना दाखवून दयायचे आहे

(पणती मंदपणे तेवत होती. तेवढ्यात सूर्यास्त झाला तरी धरतीवर मंद प्रकाश उजळला होता

**विभाग 4: भाषाभ्यास**

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) वाक्यप्रकार :**

**• पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा** **2**

(1) शाब्बास! छान काम केलेस तू! - उद्गारार्थी वाक्य

(2) मुलांनो, शिस्तीने वागा. - आज्ञार्थी वाक्य.

**(2) वाक्यरूपांतर :** **2**

**• कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा :**

(1) सर्वांनी रांगेत उभे रहावे. (आज्ञार्थी करा.) - सर्वांनी रांगेत उभे राहा.

(2) ताई उंच आहे. (नकारार्थी करा.) - ताई बुटकी नाही.

**(3) वाक्प्रचार :**

**• पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :** **4**

(1) अंगाचा तिळपापड होणे - खूप राग येणे

वाक्य: संदेश अभ्यासाबाबत आईशी खोटे बोलल्यामुळे आईच्या अंगाचा तिळपापड झाला.

(2) रममाण होणे - दंग होणे.

वाक्य : राधिका व तिच्या मित्र-मैत्रिणी जादूचे प्रयोग पाहण्यात रममाण झाल्या होत्या.

(3) भान ठेवणे. - जाणीव ठेवणे.

वाक्य: सार्वजनिक ठिकाणी कचरा न करण्याबाबत सर्वच नागरिकांनी भान ठेवायला हवे.

**प्र. 4. (आ) भाषासौंदर्य भाषिक घटकांवर आधारित कृती**

**(1) शब्दसंपत्ती :**

(i) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : **1**

(1) नदी - सरिता (2) पाणी - जल

**(ii) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :** **1**

(1) आरंभ X शेवट (2) आनंदी X दुःखी

(iii) **शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** **1**

समाजाची सेवा करणारा - समाजसेवक

**(iv) वचन बदला :** 1

(1) पैसा - पैसे (2) वही - वहया

**(2) लेखननियमांनुसार लेखन :**

**पुढील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा :** 2

(1) माझ्या शाळेचे क्रिडांगण खुप मोठे आहे.

(2) बाजारात जाताना कापडी पीशवी जवळ ठेवावी.

**(3) विरामचिन्हे :** 2

- **पुढील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा :**

(1 ) तू सहलीला येणार आहेस का

उ. तू सहलीला येणार आहेस का?

(2) आई म्हणाली, चहा कर.

उ. आई म्हणाली, "चहा कर".

## विभाग 5: उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा :**

**1. पत्रलेखन** 6

**पुढील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा :**

खुशखबर ! खुशखबर !! दिनांक १४ नोव्हेंबर
विद्या विनयेन शोभते दुपारी ४ वाजता
रसिक प्रकाशन, रत्नागिरी तर्फे
उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार प्रदान सोहळा
पुरस्कारार्थी – डॉ. नीलम गांधी – नामवंत लेखिका
टीप : कार्यक्रमस्थळी सकाळी १०.०० ते रात्री ८.०० पर्यंत सवलतीच्या दरात पुस्तक विक्री
स्थळ : रसिक प्रकाशन कार्यालय,
मंगळवार पेठ, रत्नागिरी

उ.

**पत्रलेखन :**

दिनांक ८ नोव्हेंबर २०१९
प्रति ,
मा. व्यवस्थापक.
रसिक प्रकाशन : पुस्तक विक्री विभाग,
मंगळवार पेठ
रत्नागिरी – xxxxxxxx

**विषय: शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांच्या मागणीबाबत.**

महोदय ,

मी अमिता जगदाळे. प्रगती विद्यालयाची विदयार्थी प्रतिनिधी या नात्याने हे पत्र लिहीत आहे. येत्या १४ नोव्हेंबर रोजी बालदिन आहे. त्या दिवशी आपण उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित केला आहे. हा पुरस्कार


लेखिका डॉ. नीलम गांधी यांना मिळणार आहे. याचा आम्हांस विशेष आनंद होत आहे. या निमित्ताने डॉ. नीलम गांधी यांची व अन्य काही पुस्तके आम्ही शालेय ग्रंथालयासाठी मागवू इच्छितो. पुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे आहे.

| पुस्तकाचे नाव | लेखक | प्रती |
| --- | --- | --- |
| १. विज्ञानाची कमाल टटूबंटीची धमाल | डॉ. नीलम गांधी | 4 |
| २. परदेशात... स्वप्नांच्या राज्यात ! | डॉ. नीलम गांधी | 2 |
| ३. बटाट्याची चाळ | पु. ल. देशपांडे | 2 |
| ४. स्वप्न साकारले ! | श्रीनिवास लक्ष्मणः<br>अनुवादः अनिरुद्ध पाग | |

वरील पुस्तके आम्हांला शाळेच्या पत्त्यावर पाठवण्याची व्यवस्था करावी ही विनंती. दि. १४ नोव्हेंबर रोजी आपण सवलतीच्या दरात पुस्तक – विक्री करणार आहात. ही सवलत आम्हांसही देऊ करावी अशी खास विनंती आहे. पुस्तकांबरोबर त्याचे बिलही अवश्य पाठवावे ; म्हणजे धनादेशाद्वारे रक्कम पाठवू शकू.
हे पत्र भी माननीय मुख्याध्यापकांच्या अनुमतीने पाठवत आहे.

आपली विश्वासू
अमिता जगदाळे
(विदयार्थी प्रतिनिधी - इयत्ता १० वी)
प्रगती विदयालय
चौपाड, रत्नागिरी- XXX XXX
jamita@xxxx.com

**किंवा**




उ.

पत्रलेखन :
दिनांक : १७ नोव्हेंबर २०१९
प्रति,
मा. डॉ. नीलम गांधी,
५६०/३२. 'नाथनिवास
दक्षिण सदर बझार,
नागपूर - XXX XXX

महोदया,
या वर्षीच्या बालदिनी आपणास 'उत्कृष्ट बालसाहित्याचा पुरस्कार रसिक प्रकाशन, रत्नागिरी तर्फे प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल आपले मनापासून खूप खूप अभिनंदन.
आपण गेली अनेक वर्षे लहान मुलांसाठी लेखन करीत आहात. कधी आपल्या साहसकथांनी आम्हांला आनंदित केले तर कधी विज्ञानकथांनी आम्हांला अचंबित केले. आपण मुलांसाठी विविध प्रकारचे लेखन केले आहे. आपण वृत्तपत्रांतून लिहीत असलेल्या गोष्टी आम्ही आवडीने वाचत असतो. आपली गोष्टींची पुस्तके वाचतच आम्ही लहानाचे मोठे झालो, असे म्हटले तर वावगे ठरले नाही.
बालसाहित्यातल्या आपल्या मौलिक योगदानासाठी आपणास हा पुरस्कार लाभला. याचा आम्हा सर्व विदयार्थ्यांना खूपच आनंद झाला. पुन्हा एकदा प्रगती विदयालयाच्या सर्व विदयार्थ्यांच्या वतीने आपले हार्दिक अभिनंदन.
आपल्याला भावी लेखनकार्यासाठी शुभेच्छा.

आपला कृपाभिलाषी,

अमित जगदाळे,

(विदयार्थी प्रतिनिधी इयत्ता १० वी)

प्रगती विद्यालय,

चौपाडा, , रत्नागिरी - XXX XXX

amitj@xxxx.com

2. **सारांशलेखन** **6**


मानवाला नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना तोंड दयावे लागते. अचानक येणारे मोठे दुर्दैवी संकट आपत्ती ही माणसाला नवीन नाही. आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन धोरण प्रगत व प्रगतीशील राष्ट्रांनी राबवायला हवे.

**प्र. 5.(आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा ः**

1. **जाहिरातलेखन** 5

**पुस्तक प्रकाशनाची जाहिरात तयार करा .**

उ .




2. **बातमीलेखन ः** **5**

**पुढील विषयावर बातमी तयार करा ः**

ऑगस्ट रोजी ज्ञानसंवर्धन विद्यालय् शिरुर यांचेतर्फे आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न .

उ . **बातमीलेखन :**

**ज्ञानसंवर्धन विद्यालयाच्या वक्तृत्व स्पर्धेत**

**'नूमवि' च्या विदयार्थ्यांनी मारली बाजी**

आमच्या प्रतिनिधींकडून

शिरूर, पुणे (१ ऑगस्ट) ज्ञानसंवर्धन विद्यालयाची वक्तृत्व स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. या स्पर्धेत आज नूतन मराठी विद्यालयाच्या विदयार्थ्यांनी बाजी मारली. एकूण ९ पारितोषिकांपैकी ५ पारितोषिके त्यांनी मिळवली. तसेच त्यांनी फिरता करंडकही पटकावला.
यंदा या वक्तृत्व स्पर्धेसाठी पुणे परिसरातल्या शाळा संपूर्ण तयारीनिशी सहभागी झाल्या होत्या. त्यामुळे ही स्पर्धा खूपच अटीतटीची आणि रंगतदार झाली. या स्पर्धेसाठी प्रा. स्मिता बक्षी, प्रा. अनिल नगरकर आणि प्रा. वृषाली विनायक यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. पारितोषिक वितरण सोहळ्यात जल्लोष वाढता होता. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विजय जोशी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. त्यापूर्वी स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी आपले मनोगत व्यक्त केले. ज्ञानसंवर्धन विद्यालयाचे प्राचार्य श्री. वनारसे यांनी स्पर्धेची वाढती लोकप्रियता पाहून समाधान व्यक्त केले. प्रमुख पाहुणे डॉ. जोशी आपल्या भाषणात म्हणाले की, 'वक्तृत्व कला ही प्रयत्नसाध्य कला आहे. या कलेमुळे आपण प्रभावी संवादही साधू शकता." सरतेशेवटी आभारप्रदर्शन होऊन कार्यक्रम संपन्न झाला.

**3. कथालेखन ः** 5

**पुढील मुददयांच्या आधारे कथा लिहा :**

मुद्दे : एक दूधवाला (गवळी) -- दुधात पाणी घालून विकणे – श्रीमंत बनणे - गावी जाण्यास निघणे --- वाटेत नदी– पाणी पिण्यास जाणे – पैशाची पिशवी झाडाखाली ठेवणे— वरती माक़ड – पिशवी पळवणे – दूधवाल्याने माकडाला दगड मारणे - माकडाने एक एक नोट खाली फेकणे - काही नोटा जमिनीवर तर काही नोटा पाण्यात फेकणे - काही नोटा जमिनीवर तर काही नोटा पाण्यात पडणे - दूधवाला मनात विचार करतो, “पाण्याचा पैसा पाण्यात. '

**उ. कथालेखन ः**

**पाण्याचा पैसा पाण्यातच गेला!**


एका नगरात किसन नावाचा गवळी राहत होता. तो दुधाचा धंदा करीत होता. पण त्याला झटपट श्रीमंत व्हायचे होते. त्याला एक कल्पना सुचली. त्याने हळूहळू दुधात पाणी मिसळायला सुरुवात केली. काही जण त्याच्या पातळ दुधाबाबत तक्रार करायचे; पण किसन त्यांना खोटेनाटे सांगून वेळ मारून न्यायचा. अशा प्रकारे थोड्या कालावधीतच तो श्रीमंत झाला.

एके दिवशी किसनला आपल्या गावाची आठवण आली. त्याने लगेच गावाला जायची तयारी केली. दुधाच्या धंदयातून जमवलेले सारे पैसे त्याने एका पिशवीत घेतले आणि तो आपल्या गावाकडे निघाला.

अडीच-तीन तास चालल्यावर किसन थोडा थकला. एवढ्यात वाटेत एक नदी लागली. थोडे थांबावे, पाणी पिऊन विश्रांती घ्यावी अन् मग पुढे जावे, असा विचार त्याने केला. त्याने पैशाची पिशवी झाडाखाली ठेवली आणि तो नदीवर गेला. तो पाणी पिऊन परतला आणि पाहतो तर काय! त्याची पैशांची पिशवी त्याच झाडावरील एका माकडाने पळवली होती.
किसनला राग आला. त्याने रागारागानेच काही दगड माकडावर भिरकावले. माकडाने ते चुकवले. मग माकडाने पिशवी उघडली आणि त्यातील एकेक नोट खाली टाकायला सुरुवात केली. किसन त्या नोटा पकडायला पळापळ करू लागला. काही नोटा जमिनीवर पडत होत्या; पण काही नोटा हवेवर तरंगत जाऊन नदीत पडत होत्या. त्या पाण्याबरोबर वाहून जात होत्या. किसन हताश झाला. त्याच्या मनात विचार आला. पाण्यातून मिळवलेला पैसा अखेर पाण्यातच गेला.
**तात्पर्य करावे तसे भरावे.**

**(इ) पुढील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा :** **5**

1. **प्रसंग लेखन ः**



– निमंत्रण –

'काव्यरंग,' पुणे तर्फे

काव्यगायन कार्यक्रम (वयोगट १२ ते १५ वर्षे)

प्रमुख पाहुणे – ज्येष्ठ कवी – श्री. आशिष शाह

अध्यक्ष – श्री संदीप जगताप

दिनांक १ जानेवारी संध्याकाळी ५.००

वरील कार्यक्रमात आपण सहभागी झाला होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.


उ. **प्रसंगलेखन** :

आ ज सकाळपासून मी खूप उत्साहात होतो. आज 'काव्यरंग' पुणे आयोजित काव्यगायनाच्या कार्यक्रमात मला काव्यगायनासाठी आमंत्रित केले होते. गेल्या साधारण तीन वर्षांपासून मी कविता करीत होतो. माझ्या काही कविता वृत्तपत्रांतूनही प्रसिद्ध झाल्या होत्या. 'काव्यरंग' संस्थेने १२ ते १५ वर्षे वयोगटातील १० कवींची कार्यक्रमासाठी निवड केली होती. आज १ जानेवारी. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच मला काव्यगायनाची संधी मिळाली होती. त्यामुळे मी हरवून गेलो होतो. दुपारी ४.३० च्या सुमारास मी आई-बाबांबरोबर कार्यक्रमाच्या स्थळी पोहोचलो. तेथे श्रोत्यांची बऱ्यापैकी गर्दी होती. ती हळूहळू वाढत होती. मला खूप ताण आला. एकांतात बसून कविता करणे वेगळे आणि ती समूहासमोर सादर करणे वेगळे! पण आईबाबांनी मला धीर दिला.

ठीक ५.०० वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. आमच्या या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ कवी श्री. आशिष शहा सभागृहात उपस्थित होते. सकाळ वार्ता वृत्तपत्राचे संपादक श्री. संदीप जगताप हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हजर होते. आम्ही दहा बालकवी आणि सूत्रसंचालक व्यासपीठावर बसलो होतो. एकेकाचे काव्यगायन सुरू झाले. 'वाहवा ! क्या बात है!' चे स्वर निनादू लागले. प्रत्येक कवितेनंतर टाळ्यांचा कडकडाट होत होता.

एवढ्यात सूत्रसंचालकांनी माझे नाव उच्चारले. मी क्षणभर डोळे मिटले आणि माझी पहिली कविता सादर करायला सुरुवात केली. एकेका पंक्तीनंतर 'वाहवा' ची दाद येऊ लागली. मी भारावल्यागत कविता गात होतो. माझ्या कविता जेव्हा संपल्या, तेव्हा अक्षरश: संपूर्ण सभागृह उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करीत होते. श्री. जगताप यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात माझा खास उल्लेख केला; तर कवी श्री. आशिष शाह यांनी मला शुभेच्छा दिले. आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रम संपला. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच अविस्मरणीय आनंदाचा ठेवा मनात जपत मी घराकडे निघालो.

2. **आत्मकथन ः**



उ. **आत्मकथन :**

**शाळेची घंटा**

“अरे, झाला का अभ्यास? किती दचकलास! तुझा अंदाज बरोबर आहे. मी शाळेची घंटाच बोलतेय. शाळा सुटल्यावरही थोडा वेळ जास्त बसून तू तुझा अभ्यास पूर्ण करतोस. हे खरंच कौतुकास्पद आहे. तुम्हांला वेळेची आठवण करून देणं, हे माझं कर्तव्य आहे. तुम्हांला क्षणाक्षणाचं महत्त्व सांगणं हा माझा धर्म आहे. अन् तुमच्या जीवनात नियमितपणा आणणं हेच माझं जीवन आहे.

“आमचा जन्म एका कारखान्यात झाला. माझ्या काही भगिनी मंदिरात जाऊन भक्तिमार्गावर विराजमान झाल्या; तर काही भगिनी अग्निशमन दलाच्या गाडीवर! पण मी मात्र शाळेत आले, याचा मला आनंद आहे. कारण तुम्हां विदयार्थ्यांचं आणि माझं एक अनोखं नातं आहे. तुमचं सारं लक्ष माझ्या आवाजाकडे असतं. सकाळी ११ वाजता मी वाजले की तुम्ही धावतपळत वर्गात येता. नंतर माझा आवाज आला की प्रार्थनेला उभे राहता. मधली सुट्टी अन् शाळा सुटणे यांवेळी तर माझा आवाज ऐकायला तुमचे प्राणांत गोळा होतात.

"आम्ही कोणत्याही ठिकाणी असलो, तरी आम्ही नेहमी समाजोपयोगी कामेच करीत असतो. आम्ही माणसांना सावध करतो, जागे करतो; त्यांना वेळेची आठवण करून देतो. त्या दृष्टीने आम्ही घड्याळाशी नाते सांगतो. कधी विजयोत्सवात घंटानाद केला जातो; त्यावेळेस तुमच्या इतकाच मलाही आनंद होतो. दर सहामाही, वार्षिक परीक्षेत पेपरची वेळ संपायला येते. तुम्ही जीव तोडून पेपर पूर्ण करण्यासाठी लिहीत असता. तेव्हा टोल वाजवायला मलाही जीवावर येतं. पण काय करणार! वेळेची बंधनं मलाही चुकलेली नाहीत.

"संध्याकाळी शाळा सुटल्यावर तुम्ही सर्व घरी निघून जाता. मग मात्र तुम्ही नसताना सोसावा लागणारा एकटेपणा असहय होतो. मग मी वाट पाहते ती दुसऱ्या दिवसाच्या सकाळची. गजबजलेली शाळा मला आवडते आणि तेव्हा टोले दयायलाही. चल, अभ्यास झाल्यावर सांभाळून घरी जा. उद्या भेटूच!"

3. **वैचारिक लेखन :**

**'मी माझ्या देशाचा नागरिक' या विषयावर पुढील मुद्दे विचारात घेऊन लेखन करा :**

जबाबदार नागरिक - हक्क व कर्तव्ये यांची जाणीव - देशाच्या सदयःस्थितीचे ज्ञान – - स्वतः चे वागणे – देशप्रेम व राष्ट्रीयत्व याची जाणीव.

उ. **वैचारिक लेखन :**

**मी माझ्या देशाचा नागरिक**

रेल्वेच्या कडेने प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्या यांचा नेहमी खच पडलेला असतो. रस्त्याच्या कडेला असलेली कचऱ्याची पिंपे कचऱ्याने ओसंडून वाहत असतात. लोक कुठेही थुंकतात. घरातील कचरा रस्त्यावर आणून टाकतात. गाड्या कुठेही उभ्या करतात. दुचाकीवाले तर त्यांच्यासाठी कोणताच नियम नाही, असेच मानत असतात. 'गोष्ट अरुणिमाची' या पाठातील अरुणिमा रेल्वे रुळांवर अर्धमेल्या अवस्थेत रात्रभर विव्हळत पडली होती. पण तिला कोणीही मदत केली नाही. काय म्हणायचे याला ? कोणालाही कोणाचीही पर्वा वाटेनाशी झाली आहे. आपल्यामुळे इतरांना त्रास होईल का, असा विचार जरासुद्धा मनात येत नाही. मग आपण खरोखरच देशाचे जबाबदार नागरिक झालो आहोत का? असेच जर प्रत्येक जण वागू लागला, तर देश कोसळायला वेळच लागणार नाही.

आम्ही जबाबदार नागरिक व्हायचे म्हणजे काय करायचे? हे समजून घेण्यासाठी दूर जाण्याची गरज नाही. आपल्या पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञा आपण प्रामाणिकपणे पाळली तर नक्कीच उत्तम नागरिक होऊ शकतो. काय सांगते ती प्रतिज्ञा?

आपण सगळ्यांशी सौजन्याने वागले पाहिजे. वडीलधाऱ्यांचा मान राखला पाहिजे. देशबांधवांच्या कल्याणासाठी झटले पाहिजे. काय सुचवते ही प्रतिज्ञा? आपण सौजन्याने वागायचे ते केवळ दुसऱ्यांना बरे वाटावे म्हणून नको. या सौजन्यातून आपण दुसऱ्यांच्या भावभावनांचा, त्यांच्या इच्छा-आकांक्षांचा आपण मान राखतो. आपल्या घटनेने आपल्याला संपूर्ण स्वातंत्र्य बहाल केले आहे. हे स्वांतत्र्य आपण मनापासून उपभोगावे. पण दुसऱ्यांनाही तसेच स्वातंत्र आहे, हे लक्षात ठेवावे. स्वतःचे हक्क जगता जगता इतरांच्या हक्कांना बाधा पोहोचता कामा नये. यासाठी आपण काय केले पाहिजे?

आपण सर्व प्रकारची समानता पाळली पाहिजे. जात, धर्म, भाषा, लिंग, प्रदेश यांवरून भेदभाव करता कामा नये; त्यांना समान संधी मिळाली पाहिजे. आपण अजूनही स्त्रियांना समान हक्क दिलेले नाहीत. तसेच, शहरात सर्व सुखसोयी असतात. चोवीस तास वीज उपलब्ध असते. त्याचवेळी ग्रामीण भागात १०- १०,१५-१५ तास लोडशेडिंग असते. हे सगळे थांबले पाहिजे. तरच सर्वांना समान संधी मिळेल. हा देश माझा आहे, मी देशाचा आहे अशी भावना बाळगून आपण वागले पाहिजे. सर्वप्रथम हे पाहिले पाहिजे की, अन्य कोणीही तसे वागो न वागो, मी मात्र तसेच वागणार, असा ठाम निश्चय प्रत्येकाने केला पाहिजे. मग देशाची उनत्ती दूर राहणार नाही.

***********